# प्रेसनोट

## भंडारा जिल्हा पोलीस यांचे सौजन्याने आंतराष्ट्रीय योग शिबीर

जा.क्र. ३१६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:– २१/०६/२०१८

**भंडारा** :– दिनांक २१/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीस यांचे सौजन्याने आंतराष्ट्रीय योग दिनानिमीत्त योग शिबीराचे आयोजन दीप प्रज्वलाने करण्यात आले. पोलीस चैतन्य मैदानावर पंतजली योग समीतीचे प्रशिक्षणार्थी प्रियांशु राजेश पांण्डेय, प्रविण कारेमोरे, उज्वल पांण्डेय आयोजक राजेश पांण्डेय यांनी पोलीस अधीकारी व कर्मचारी यांना योगाचे शिथलीकरण व्यायाम, प्रार्थना, रिवा चालन स्कंद खिचाव, स्कंद चालन, कंटी चालन, घुटना चालन, ताडासन, वृक्षासन, पादहस्तासन, अर्धचक्रासन, त्रिकोणासन, दंडासन, भद्रासन, वज्रासन, अर्धउष्ट्रासन, उष्ट्रासन, शशकासन, उथ्थान मंडूकासन, वक्रासन, मकरासन, भुंजगासन, शलभासन, सेतू बंधासन, उत्थानपादासन, अर्धहनासन, पवनमुक्तासन, शवासन, कपालभॉती, नाडीशोधन, शतली प्राणायाम, भ्रामरी प्राणायाम, ध्यान ईत्यादी योगाचे प्रकार शिकविले.

आंतराष्ट्रीय योगा दिनानिमीत्त घेण्यात आलेल्या योगा व प्राणायम शिबीरात रश्मि नांदेडकर, अपर पोलीस अधीक्षक भंडारा पोनी. मंडलवार प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह), श्री. जोगदंड उपविभागीय पोलीस अधीकारी भंडारा श्री. तिक्कस उपविभागीय पोलीस अधीकारी पवनी, श्री. डिसले उपविभागीय पोलीस अधीकारी साकोली, तसेच पोलीस स्टेशन व शाखेतील पोलीस अधिकारी तसेच कर्मचारी उपस्थित होते.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आह

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.